# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.08.2025** **वार:गुरुवार**

1. श्री गणरायाचं राज्यभरात हर्षोल्हासात आगमन
2. दीड दिवसांच्या गणेशाच्या विसर्जनासाठी प्रशासन सज्ज, मूर्तीदानासाठी संकलन केंद्रं
3. पथविक्रेत्यांच्या स्वावलंबनासाठी पीएम स्वनिधी योजनेला पुनर्रचनेसह मुदतवाढ
4. 5 ते 15 वर्षे वयोगटातील शालेय मुलांसाठी आधार अनिवार्य बायोमेट्रिक माहिती ताजी करण्याच्या सूचना आणि
5. पालघर जिल्ह्यात चार मजली इमारत चाळीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत 15 जणांचा मृत्यु

**गणेशोत्सव**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजरात, भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या मूहुर्तावर काल राज्यभरात घरगुती तसंच सार्वजनिक मंडळांमध्ये विघ्नहर्त्याची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. यंदा अकरा दिवसांसाठी सुरू राहाणाऱ्या या मंगलमय पर्वाच्या आरंभाचा हा आढावा...

**मांगल्य आणि हर्षोल्हासी वातावरणात राज्यात सर्वत्र विघ्नहर्त्याचं काल वाजतगाजत आगमन झालं. राजभवनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या निवासस्थानी गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसमवेत राज्यपालांनी गणेशाची आरती केली. राजभवनातील ही मूर्ती नाशिकच्या केंद्रीय मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनी शाडू मातीपासून साकारलेली पर्यावरणपूरक मूर्ती आहे. तर मुख्यमंत्र्यांच्या मुंबईतल्या वर्षा निवासस्थानीही गणेशाचे आगमन झाले. मुंबईत चिंचपोकळीचा चिंतामणी, लालबागचा राजा यांच्यासह बारा हजार सार्वजनिक तर सव्वालाख घरगुती गणपतींची प्रतिष्ठापना झाली. त्याशिवाय राज्यात विविध जिल्ह्यांमध्येही घरगुती आणि सार्वजनिक गणेशांचे आगमन झाले. पुण्यातल्या ऐतिहासिक गणेशोत्सवात मानाच्या पहिल्या पाच गणपतींची विधीवत प्रतिष्ठापना झाली. तर भाऊ रंगारी, अखिल मंडई गणपती, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतींसह प्रमुख मंडळाचे श्रीगणराय विराजमान झाले. पुण्यात 37 व्या पुणे फेस्टिवलची काल सुरुवात झाली. यामध्ये आठ दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळते. नागपुरात टेकडी गणपती या विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या बाप्पाच्या दर्शनाला भाविकांनी सकाळपासून गर्दी केली होती. घरगुती तसेच सार्वजनिक मंडळामध्ये श्रींच्या आगमनाची लगबग सुरू होती. कोल्हापुरात श्री अंबाबाई मंदिरातील गणेशाची स्थापना झाली. तसेच घरगुती, सार्वजनिक गणरायाच्या स्वागतासाठी कोल्हापूरकर सज्ज झाले होते. जळगाव जिल्ह्यात यंदा सार्वजनिक गणेशोत्सवासोबतच 160 गावांमध्ये एक गाव एक गणपतीचा स्तुत्य उपक्रम राबवला जात आहे. बुलडाणा जिल्ह्यात खामगाव शहराचे आराध्य दैवत असलेल्या दीडशे वर्ष जुन्या लाकडी गणपतीची कलश यात्रा काढून नव्या मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. ही बाप्पाची सहा फूट उंचीची संपूर्ण लाकडातली मूर्ती आहे. पालघर जिल्ह्यातही सार्वजनिक गणेशांची स्थापना झाली. यंदा वसई विरार महापालिकेकडून पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेश स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. धुळ्यात दोंडाईचा इथल्या श्रीमंतराजा गणपतीची प्रतिष्ठापना राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते करण्यात आली. रत्नागिरी जिल्ह्यात यंदा एक लाख 69 हजार 552 खासगी, तर 126 सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. अहिल्यानगर सोलापूर, वाशीम, लातूर, नांदेड, बीड इथंही बाप्पाचं आगमन झालं. तर नाशिक, हिंगोली इथं भर पावसात घरगुती आणि सार्वजनिक गणेशाचे आगमन जल्लोषात झालं. दिल्लीत महाराष्ट्र सदनामध्ये खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. गणेशोत्सवाच्या**

**निमित्ताने दिल्लीत सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातल्या अनेक राजकीय नेत्यांच्या घरीही विघ्नहर्त्याचं आगमन झालं. यामध्ये मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, पर्यावरण आणि वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे, भाजप नेते विनोद तावडे, हर्षवर्धन पाटील तसंच खासदार प्रणिती शिंदे यांच्या पुण्यातल्या घरी बाप्पाचं आगमन झालं. यंदा बहुतांश ठिकाणी पर्यावरणपूरक गणेशोत्सव करण्यावर भर दिल्याचं दिसून येत असून, प्रशासनाकडूनही सोयीसुविधा पुरवण्यात येत असून, राज्यात सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था सज्ज असल्याचं चित्र आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह पूजा दीक्षित पुणे.**

**रील स्पर्धा**

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्याच्या निमित्तानं सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीनं रील स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी सात सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करुन, रील अपलोड करायचे आहेत. पहिल्या तीन क्रमांकांसाठी रोख पारितोषिकं देण्यात येतील.

**पुणे-गणेश दीड दिवस**

पुण्यातल्या वैभवशाली गणेशोत्सवाला काल सुरुवात झाली. दीड दिवसांच्या घरगुती बाप्पांना आज निरोप देण्यात येईल. त्यांच्या विसर्जनासाठी पुणे महापालिकेची यंत्रणा सज्ज आहे. नदीकाठच्या सर्व घाटांवर विसर्जनाची तयारी करण्यात आली आहे. तसंच 38 कृत्रिम हौद, 281 ठिकाणी 348 लोखंडी टाक्यांमध्ये विसर्जनाची सोय केल्याची माहिती पालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी दिली आहे. 338 ठिकाणी निर्माल्य कलशांची व्यवस्था करण्यात आली आहे. 241 ठिकाणी मूर्तीदान केंद्रं उभारण्यात आली आहेत.

**पिंपरी चिंचवड आवाहन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागानं, प्लास्टिक तसंच विघटन न होणारा कचरा थेट पाण्यात अथवा नदीकाठी न टाकता, विसर्जन स्थळी निर्माल्य संकलनासाठी ठेवलेल्या कुंड्यांमध्ये हे साहित्य टाकण्याचं आवाहन केलं आहे.

**पालघर-मूर्तीदान**

पालघर नगरपरिषदेनंही मूर्तीदानाचा उपक्रम राबवण्यासाठी शहराच्या पश्चिम भागात दोन मूर्ती संकलन केंद्रं उभारली आहेत. तसंच दोन कृत्रीम तलाव, निर्माल्य संकलन केंद्र देखील तयार करण्यात येत आहेत. यासाठी नगरपरिषदेनं 32 कर्मचाऱ्यांनी नियुक्ती केली आहे.

**पीएम स्वनिधी मुदत वाढ**

पथविक्रेत्यांना स्वावलंबनाचा मार्ग दाखवणाऱ्या पीएम स्वनिधी योजनेच्या पुनर्रचनेला केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली. त्यानुसार कर्ज रक्कमेत वाढ करुन प्रथमच कर्ज घेणाऱ्यांना आता 10 हजारांऐवजी 15 हजार रुपये तर दुसऱ्यांदा कर्ज घेणाऱ्यांना 20 हजाराऐवजी 25 हजार रुपये कर्ज मिळू शकणार आहे. तिसऱ्या टप्प्यासाठी कर्ज मर्यादा 50 हजार रुपये कायम ठेवण्यात आली आहे. पुनर्रचना करण्याचा उद्देश एक कोटी 15 लाख लाभार्थ्यांपर्यंत पोचण्याचा असून, त्यात 50 लाख नव्या लाभार्थ्यांचा समावेश असेल.

**मुले-आधार**

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणानं देशभरातील शाळांना 5 ते 15 वर्षे वयोगटातील मुलांसाठी आधार अनिवार्य बायोमेट्रिक माहिती वेळेत ताजी करण्यास सांगितले आहे. प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश कुमार यांनी यासंदर्भात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून या माहिती संकलनासाठी शिबिरं आयोजित करण्याची विनंती केली आहे. प्राधिकरण आणि शालेय शिक्षण विभागाच्या या संयुक्त उपक्रमाद्वारे देशभरातील 17 कोटी बालकांची बायोमेट्रिक्स माहिती ताजी करणं सोपं होईल अशी अपेक्षा आहे.

**जनधन**

प्रधानमंत्री जन धन योजनेला आज 11 वर्षे पूर्ण होत आहेत. जगातील सर्वात मोठ्या आर्थिक समावेशक उपक्रमांपैकी एक अशा या योजनेची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट 2014 या दिवशी केली होती. प्रधानमंत्री जन धन योजना ही व्यापक आर्थिक समावेशकतेसाठी एक राष्ट्रीय अभियान असून देशातील सर्व कुटुंबांना बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी त्यात एकात्मिक दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे.

**मुंबई उच्च न्यायालय-आराधे**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाजमाध्यमांवर एका संदेशाद्वारे ही माहिती दिली आहे. न्यायमूर्ती चंद्रशेखर यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे.

**अपघात-जळगाव**

जळगाव शहराबाहेरून जाणाऱ्या पाळधी ते तरसोद बाह्यवळण मार्गावर दोन ट्रक समोरासमोर धडकून काल अपघात झाला. या घटनेत दोन्ही ट्रकचे चालक ठार झाले. तर 1 जण गंभीर जखमी झाला.

**गडचिरोली-नक्षलवादी**

गडचिरोली जिल्ह्याच्या भामरागड तालुक्यात कोपर्शी गावातल्या जंगलामध्ये पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत काल चार नक्षलवादी ठार झाले. यामध्ये एक पुरुष आणि तीन महिलांचा समावेश आहे. अनेक तास चाललेल्या या चकमकीत नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबाराला पोलिसांनी प्रत्युत्तर दिलं, त्यामध्ये हे चार नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळावरून काही शस्त्रास्त्रं ताब्यात घेण्यात आली आहेत. नक्षल्यांची ओळख पटवण्यात येत आहे.

**इमारत-पालघर**

पालघर जिल्ह्यातल्या विरारमध्ये चार मजली इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत 15 जणांचा मृत्यु झाला आहे. मंगळवारी रात्री 12 वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. महानगरपालिका आणि एन.डी.आर.एफ ची दोन पथकं ढिगाऱ्याखालून नागरिकांना शोधण्याच्या कामात गुंतली होती. या इमारतीचा मागील भाग खाली असलेल्या चाळीवर कोसळून ही दुर्घटना घडली. ती चाळ पूणपणे उध्वस्त झाली आहे. या इमारतीमधील 50 पैकी अंदाजे 12 सदनिका कोसळल्याचं समजतं.

**पर्लकोटा पूर- गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यालगत छत्तीसगड राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळं भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीला पूर आला असून, गावात पुराचं पाणी शिरल्यानं जनजीवन विस्कळीत झाले आहे. या परिसरातल्या शंभर गावांचा संपर्क तुटला आहे. यंदाच्या मोसमात पर्लकोटा नदीला चौथ्यांदा पूर आला आहे.

लातूर जिल्ह्यातील मांजरा धरणाच्या सहा दरवाजातून नदीपत्रात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. तर रेणापुर प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग होण्याची शक्यता असल्यानं, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यांवर आणि मराठवाडा तसंच विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकणातही मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.